बृहन्मुंबई महानगरपालिका

प्र.ले./वित्त/प्रकल्प/ ४९, दि.१५.०३.२०२१

**परिपत्रक**

२०२०-२१

**विषय:-** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये नगरसेवक निधी, विभाग विकास निधी आणि स्थायी समिती/महानगरपालिका स्तरांवर निश्चित केलेल्या विशेष निधीतिल तरतूदीमधून करावयाच्या कामांना मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ :-** सीए/एफआरडी-१/६४ दि. २५.०३.२०१३.

उपभोक्ता खात्यामर्फत काहीवेळा आर्थिक वर्षाच्या शेवटी कार्यादेश दिले जातात व विकास कामे घाईत केली जातात.त्यामुळे विकास कामांचा योग्य तो दर्जा राखला जात नाही व आर्थिक वर्षाच्या शेवटी देयकांचा भारदेखील जास्त असतो. यास्तव आर्थिक शिस्त राखण्याकरिता तसेच संबंधित विभागामार्फत कार्यादेश वेळेतच देऊन काम समाधनकारकरित्या पुर्ण करण्याच्या अनुषंगाने संदर्भीत परिपत्रकान्वये मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली होती.

तथापि सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये कोव्हिड-१९ मुळे मोठा कालावधी व्यपगत झाला. त्याचप्रमाणे माहे नोव्हेंबर -२०२० मध्ये सॅप प्रणालीच्या आधुनिकरणाकरिता सॅप प्रणाली बंद होती. त्यामुळे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये नगरसेवक निधी, विभाग विकास निधी आणि स्थायी समिती /महानगरपालिका यांच्या स्तरांवर निश्चित केलेल्या विशेष निधीमधून उपलब्ध असलेल्या तरतूदीतून संबंधित विभागीय सहायक आयुक्त हे दि.३१.०३.२०२१ पर्यंत कार्यादेश देतील. जी कामे/पुरवठा पूर्ण होईल त्याची देयके दि.३१.०३.२०२१ पर्यंत प्रमाणित करून अधिदानासाठी संबंधित लेखा विभागाकडे सादर करतील.

परंतू अश्याप्रकारे देण्यात आलेल्या कार्यादेशाचे काम/पुरवठा तसेच अधिदान सन २०२०-२१ मध्ये होऊ शकले नाही, त्या सर्व प्रकरणांमध्ये उर्वरित कार्यादेशाची एकूण रक्कम (प्रकल्प आकार, वस्तू व सेवा करांची रक्कम इ. सह) किंवा विनियोग न झालेली तरतूद यापैकी जी रक्कम कमी असेल, ती रक्कम सन २०२१-२२ मध्ये त्या त्या सेवाशिर्षाखाली स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येईल.

सन २०२०-२१ मध्ये नगरसेवक निधी, विभाग विकास निधी आणि स्थायी समिती/ महानगर पालिका स्तरांवर निश्चित केलेला विशेष निधी या व्यतिरिक्त इतर तरतूदीकरिता परिपत्रक क्र. सीए/एफआरडी-१/६४ दि. २५.०३.२०१३ अन्वये देण्यात आलेले निदेश कायम असतील.

सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुख/ रुग्णालय अधिष्ठाता/वैद्यकिय अधिक्षक व लेखा अधिकारी/ उप प्रमुख लेखापाल यांनी उपरोक्त आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

हि सवलत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापुरतीच मर्यादित असेल.

१०/०२/२०२१

प्रमुख लेखापाल (वित्त)

१०/०३/२०२१

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

महानगरपालिका आयुक्त

Scanned with CamScanner